लोकमत

## भुयारी मेट्रो ३ : ॲडव्होकेट जनरल यांच्या उपस्थितीत भुयारीकरण

# सिद्धिविनायक ते दादर स्थानकाचा टप्पा पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** सोमवारी १.१० किलोमीटरचा भुयारीकरणाचा ३२वा टप्पा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन (एम.एम.आर.सी.)तर्फे पूर्ण करण्यात आला. हे भुयारीकरण सिद्धिविनायक उत्तर शाफ्ट ते दादर मेट्रो स्थानक इतके आहे. या प्रसंगी राज्याचे महाधिवक्ता आशुतोष कुंभकोणी उपस्थित होते.

- कृष्णा २ हे टनेल बोअरिंग मशीन १६ डिसेंबर २०१९ रोजी भूगर्भात सोडण्यात आले होते. या मशीनने आज २९५ दिवसात ७९१ रिंगच्या साहाय्याने अपलाइन भुयारीकरण पूर्ण केले.
- मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक सुविधेमध्ये सकारात्मक बदल होणार असून हे एक वरदान ठरणार आहे.

नागरिकांना कामामुळे होणारा त्रास कसा कमी होईल याचा विचार करून हे महत्त्वपूर्ण आणि अवघड काम पूर्ण करणे कौतुकास्पद आहे. यामुळे मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक सुविधेमध्ये सकारात्मक बदल होणार असून हे एक वरदान ठरणार आहे, असे कुंभकोणी म्हणाले.



असे झाले भुयारीकरणाचे काम.

## पॅकेज ४मध्ये

दादर-सिद्धिविनायक आणि शितलादेवी या स्थानकांचा समावेश असून दादर स्थानकाचे ६१ टक्के काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत एकूण ९४ टक्के भुयारीकरण आणि ९५ टक्के खोदकाम पूर्ण झाले आहे. पूर्ण प्रकल्पाचा विचार करता ८७ टक्के भुयारीकरण आणि ६० टक्के बांधकाम पूर्ण झाले आहे.

> दादर मेट्रो स्थानक रहिवासी इमारती आणि व्यापारी आस्थापने यांच्यामध्ये बांधण्यात आले असून, मुंबई मेट्रो ३च्या स्थानकांपैकी एक महत्त्वाचे स्थानक आहे. त्यामुळे आजचा भुयारीकरणाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण करणे हे आव्हानात्मक होते.
>
> **- रणजित सिंह,**
> संचालक,
> एमएमआरसी

नागरिकांचा त्रास कसा कमी होईल याचा विचार करून हे महत्त्वपूर्ण आणि अवघड काम पूर्ण करणे कौतुकास्पद आहे.